वृत्तपत्राचे नांव :– नवशक्ती

वृत्तपत्र प्रकाशनाचे ठिकाण :– मुंबई

वृत्तपत्र पान क :– 8

दिनांक :–10/08/2008



## सहज संवाद

रमाकांत पाटील

ईशावास्य नावाचे एक उपनिषद आहे. त्याच्यात केवळ अठरा श्लोक आहेत. गीतेचे अठरा अध्याय तर ईशावास्याचे केवळ अठरा श्लोक! एवढ्या लहान उपनिषदात सारा वेदान्त सामावला आहे, असे विनोबांचे म्हणणे आहे.

महात्मा गांधींनी या उपनिषदावर लिहून देण्याची विनोबांना आज्ञा केली. विनोबांनी त्यावर भाष्य लिहिले. मग गांधीजींनी उपनिषद तोंडपाठ केले . गांधीजी तेव्हा ससून हॉस्पिटलमध्ये होते. त्यानंतर दहा वर्षांनी विनोबांनी गांधींजीना हे लिहून दिले! विनोबा जेलमध्ये असताना हे टिपण त्यांच्या मित्रांनी प्रकाशित केले . ते हातात आल्यानंतर विनोबांनी त्याचा थोडा विस्तार करून लिहिले. त्याला नाव दिले- ईशावास्य वृत्ति. हे क्राऊन एकशे दहा पानी पुस्तक आहे. विनोबांच्या आश्रमात हे अठरा श्लोक रोज म्हटले जातात. गीतेचे सार या उपनिषदात येऊन जाते. गीता सातशे श्लोकांची आणि अठरा अध्यायाची. त्या मानाने हे अगदी लहान उपनिषद आहे. विनोबांच्या म्हणण्यानुसार हे एक परिपूर्ण उपनिषद आहे. पारमार्थिक जीवनाचा परिपूर्ण आराखडा यात थोडक्यात मांडला आहे. विनोबा म्हणतात - ''ईशावास्य एक लहानशी वस्तू आहे. परंतु त्याच्या चिंतनात माझ्या आयुष्याची कैक वर्षे गेली आहेत. ईशावास्य वृत्ति पुस्तकात त्या चिंतनाचे सार कमीत कमी शब्दात देण्याचा प्रयत्न आहे. त्याचा विस्तार पुष्कळ करता आला असता. परंतु अनुभवाची गोष्ट शब्दांचा विस्तार करून प्रकाशित होत नाही. म्हणून थोडक्यात समाधान मानून घेतले. गांधीजींची आज्ञा नसती तर इतके देखील झाले नसते. त्यांची आज्ञा समर्थ होती आणि तिनेच हे लिहविले. ईशावास्य माझ्या हृदयाला अवर्णनीय समाधान देते. आमची सकाळची प्रार्थना त्यानेच होते. त्याचे अनेक मंत्र गूढ भासतात. परंतु माझ्याशी ते मोकळ्या मनाने गोष्टी करतात. आपले हृदय माझ्यासमोर उघडे करून ठेवतात. तेच मी मोडक्या तोडक्या भाषेत व्यक्त करण्याचा




**जगातील पहिला ग्रंथ वेद होय असे लोक मानतात. वेदांचे सार ज्या ग्रंथात आले आहे त्यांना वेदान्त म्हणतात. ईशावास्य हा असा वेदान्त ग्रंथ आहे.**

प्रयत्न केला आहे.''

विनोबा या उपनिषदाविषयी लिहितात, 'हे एक लहानसे उपनिषद आहे, पण त्यात एवढा गहन अर्थ सामावला आहे की अशी लहानशी रचना क्वचित असेल. याचे फक्त अठरा श्लोक आहेत. जगातील पहिला ग्रंथ वेद होय असे लोक मानतात. वेदांचे सार ज्या ग्रंथात आले आहे त्यांना वेदान्त म्हणतात. ईशावास्य हा असा वेदान्त ग्रंथ आहे. वेदान्ताचे ग्रंथ पुष्कळ आहेत, परंतु यात थोडक्यात वेदांचे सार आलेले आहे. आणि त्याचेही सार त्याच्या पहिल्या मंत्रात आलेले आहे. जगात जे काही जीवन आहे ते सर्व ईश्वराने वसविलेले आहे. कोणतीही वस्तू ईश्वररहित नाही. सत्तेच्या भाषेत बोलायचे तर इथे कयळ ईश्वराची सत्ता आहे. तोच एक स्वामी आहे, हे ओळखून आम्ही सर्व काही त्याला समर्पण करायला हवे. आणि जे काही त्याच्यापासून मिळेल ते प्रसाद समजून ग्रहण करायला हवे. इथे माझे काहीही नाही. सर्व ईश्वराचे आहे, अशी भावना राखायला पाहिजे. जो माणूस अशा प्रकारे राहील, कोणतीही वस्तू आपली मानणार नाही त्याचे 'सर्व' जग होईल. सर्व त्याला मिळेल. जे काही त्याला मिळेल त्यात तो संतुष्ट राहील. दुसऱ्याचा मत्सर करणार नाही. कोणाच्या धनाची अभिलाषा करणार नाही.

या लहानशा मंत्रात महान जीवनव्यापी सिद्धान्त सांगितलेला आहे. आणि तो अमलात आणण्याचा उपायही सांगितला आहे. ईश्वर समर्पण प्रसादरूपाने ग्रहण, मत्सर न करणे, धनाची वासना न राखणे अशा प्रकारे एक संपूर्ण विचार या मंत्रात आमच्यासमोर मांडला आहे. असे दिसून येते की मनुष्य दुसऱ्याच्या धनाची अभिलाषा धरतो. असे का? अशासाठी की तो आळसात जगू इच्छितो. दुसऱ्या मंत्रात एवढ्यासाठी म्हटले आहे की, कर्म न करता जगण्याची इच्छा करणे म्हणजे जीवनाशी बेइमान होणे होय. निरंतर कर्म करून जशा प्रकारचे जीवन देव आम्हांला देईल तसे आम्ही जगायला पाहिजे. जेव्हा आम्ही कर्म टाळतो तेव्हा जीवन भाररूप होते, शापरूप होते. त्यामुळेच आपण दुःख भोगीत असतो. जगात जी पापे आहेत ती देखील त्यामुळेच पुष्कळशी उत्पन्न झाली आहेत. ईशावास्य उपनिषद कळायला कठीण आहे. ते पुन्हा-पुन्हा अर्थासह वाचले पाहिजे. ते लहान असले तरी परिपूर्ण विचार त्यात आहे.

(लेखकाचा दूरध्वनी: २६२०८६४९)